Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 2.2052 (UIF)
Volume-3 | Issue-9 | March-2014 Available online at www.aygrt.isrj.net

समस्याप्रधान नाटक वाटा-पळवाटा एक आकलन

पारसे बिरा दशरथ

सहयोगी प्राध्यापक मराठी विभाग, श्री. शिवाजी महाविद्यालय, बार्शी
ता. बार्शी जि. सोलापूर

सारांश - 'वाटा-पळवाटा' हे नाटक दलित चळवळीत काम करणाऱ्या तीन पिढया आधोरेखित करते. हया तीनही पिढया डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या व्यक्तिमत्त्वाने आणि विचार प्रणालीने भारावलेल्या आहेत. पहिली पिढी ब्रिटिश राजवटीतील अशिक्षित एखाद्या प्रश्नाची सखोल चर्चा करावी एवढी उसंत नसणारी एवढा बौध्दिक आवाकाही नसणारी पण चळवळीसाठी प्रामाणिक आणि निष्ठावान कार्यकर्त्याची आहे. दुसरी पिढी सुशिक्षित थोडे आर्थिक स्थैर्य लाभलेली, स्वातंत्र्याच्या आगमनामुळे लोकशाही जीवनपध्दतीचे आश्वासन मिळालेली, त्याचबरोबर आपल्या समाजाच्या प्रश्नांचा गंभीरपणे विचार करणारी अशी आहे. तर तिसरी पिढी स्वातंत्र्योत्तर काळातील परिवर्तनाची गती आणि अपेक्षा हयातील व्यस्त प्रमाणामुळे कमालीची संतापलेली धाडसी पण लोकशाहीवरचा विश्वास गमावून बसलेली अशी आहे. हया तीनही पिढयाचे चित्रण सम्यकदृष्टीने करावे हा हेतू मनात बाळगून लेखक दत्ता भगत यांनी हे नाटक लिहिले आहे.

प्रस्तावना-

नाटकाचे नांव 'सखेद सादर करीत आहे' असे प्रथम होते. व्यावहारिक गरज म्हणून हया नाटकाचे 'वाटा-पळवाटा' असे सुटसुटीत नाव निश्चित करण्यात आले. प्रस्तुत नाटकात प्रत्येक व्यक्तीची वाट अन्य व्यक्तीला पळवाट वाटते. त्यामुळे नाटकाचे नामकरण करताना हेच सूत्र डोळयासमोर ठेवण्यात आले आहे. फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचार प्रणालीतून दलित नाटककारांनी प्रेरणा घेऊन आपल्या नाटकातून माणूकीचा शोध, नातेसंबंध, मानवी मनातील गुंतागुंत, सामाजिक, राजकीय प्रश्न, सांस्कृतिक आणि कौटुंबिक जीवन, आत्मभान, आत्मशोध, स्वत्त्वांची जाणीव नाटकामधून व्यक्त केली. विजय तेंडूलकर, वसंत कानेटकर, वि. वा. शिरवाडकर, जयवंत दळवी, चि. त्र्यं. खानोलकर, सतीश आळेकर, महेश एलकुंचवार, अनिल बर्वे, मधुकर तोरडमल, अच्चुत वझे इ. नाटककारांनीही आपल्या नाटकातून संघर्षाचे स्वरुप व्यक्त केले आहे. त्याच बरोबर प्रेमानंद गज्वी, दत्ता भगत, संजय पवार, जयंत पवार, टेक्सास गायकवाड, रामनाथ चव्हाण, रुस्तुम आचलखांब, वसंत लोढे, भि. शि. शिंदे, प्रकाश त्रिभुवन, इ. दलित नाटककारांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या परिवर्तनवादी विचारातून प्रेरणा घेऊन दलित जीवनाची दाहकता सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक समस्या आपल्या नाटयलेखनातून मांडल्या. त्यापैकी दत्ता भगत यांचे 'वाटा-पळवाटा' हे नाटक यादृष्टीने महत्त्वाचे आहे.

सतीश गोडघाटे हे प्राध्यापक, काका हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या बरोबर चळवळीत सक्रिय सहभाग घेतलेले दलित कार्यकर्ते सतीशला त्यांनी प्रतिकूल परिस्थितीतही शिकवलेले असते परंतु तो त्यांच्या मनाविरुध्द हेमा रानडे नावाच्या ब्राम्हण मुलीबरोबर लग्न करतो. आजही ही घटना काका विसरु शकत नाहीत. दिवसाला सुरुवात झाली की, काकांच्या जातीयवादी भाषणाला सुरुवात होते. त्यांच्या ब्राम्हण जातीवरुन बोललेले कुजके बोल हेमाला सातत्याने ऐकावे लागतात ते बोल तिच्या ह्दयावर आघात करतात. तरीही ती त्यांना नेहमी समजून घेते प्रसंगी त्यांना सावरते.

साधी हाक जरी मारली तरी तिला 'जी' म्हणावे लागते ही त्यांची सक्ती पाळते. अन त्यांना बजावून सांगते 'उठसूठ माझ या जातीचं नाव काढणं बंद करा' परंतु 'जात न्हाई ती जात' हा डॉ. बाबासाहेबांनी सांगितलेला सिध्दांत त्यांच्या मनात पक्का घर करुन असतो. बाबासाहेबाबरोबर तीस-चाळीस वर्षे फिरलो पण गेली का जात? असा व्यावहारिक सवाल असतो. अशातही काकांचा सतीशवर भारी जीव आई-वडीलांच्या माघारी काकांनीच सतीशला लहानाचे मोठे केलेले असते.

वाटा -पळवाटा हे दत्ता भगत यांचे अत्यंत गाजलेले नाटक आहे. थिएटर अकादमीने 'नाटयलेखन कार्यशाळा' प्रकल्पासाठी विजय तेंडुलकर अध्यक्ष असलेल्या निवड समितीने निवड केली. त्या माध्यमातून प्रस्तुत नाटकाची निर्मिती झाली. प्रारंभी या नाटकाचे 'सखेद सादर करीत आहे' असे दिले होते. पण व्यावहारिक गरज म्हणून या नाटकाचे नाव 'वाटा-पळवाटा' असे सुटसुटीत करण्यात आले. थिएटर अकादमी, पुणे आयोजित 'नवनाटककार नाटयमहोत्सव मध्ये टिळक स्मारक मंदिर, पुणे येथे रविवार, दि. २७ डिसेंबर, १९८७ रोजी या नाटकाचा पहिला प्रयोग सादर करण्यात आला.

या नाटकात समाजव्यवस्थेचे सूक्ष्म पदर नाटककारांन उलगडून दाखविले आहेत. दलित, ब्राम्हण व मराठा असे जाती-वर्ज गट हे समाजव्यवस्थेचे कप्पे रेखाटलेले आहेत. काका, सतीश, अर्जुन हे दलित हेमा, दासराव व सोनल हे ब्राम्हण आणि इतर मराठा जाती गटातील आहेत.

प्रस्तुत नाटकात डॉ. आंबेडकरांच्या विचाराने भारलेल्या तीन पिढयांचे चित्रण केलेले आहे. यातील प्रत्येक पिढीची विशिष्ट अशी एक भूमिका आहे. त्यानुषंगाने सामाजिक स्तरभेदाचे दर्शन या नाटकात घडते. काही पात्रांच्या संवादातून हे सामाजिक स्तर जाणवतात. दासराव जोशी हे काकांना 'नमस्कार' घालतात तर काका त्यांना 'जयभीम' करतात (पृ.८) असे चित्रण पृ.२५ व ५३ वर दिसून येते 'नुसते हिंडाय फिरायचे बामणी चाळे'(पृ.१३) तसेच सवर्णांनी त्यांच्या वस्तीत गणपतीचे देऊळ बांधणे आणि बौध्दां-ी विहार उभारणे, हिंदूनी 'हरिविजय', 'पांडवप्रताप' या ग्रंथाचे पारायण करणे तर बौध्दांनी बौध्द ग्रंथाचे पारायण करणे बौध्द मूर्तीला फुले वाहणे आणि मारुतीच्या गळयात रुचकीच्या माळा टाकणे (पृ. ५२,५३) यातूनि धार्मिक स्तरभेदाचे दर्शन घडते.

समाजव्यवस्थेचे लक्षण म्हणजे जातीयता होय. 'जातीसाठी माती खाण्या' ची प्रवृत्ती आहे. मनुष्य आपपल्या जाती परिघामध्येच राहतो. त्याबाहेर सहसा तो जात नाही आणि जे जातात त्याला समाज स्वीकारत नाही. म्हणूनच दासराव हे सोनलचा विवाह अर्जुनबरोबर न होऊ देता अरविंद देशमुख या जातीतल्या युवकाशी सोयरीक जमवतात आणि आंतरजातीय विवाह करजाऱ्या हेमा-सतीश संधी मिळेल तेथे विरोध करतात. म्हणूनच ते सतीशला घर भाडयाने देत नाही. हेमा जरच ब्राम्हण आहे की काय? वगैरे (पृ.४७) अशी निर्भर्त्सना करतो. त्याच प्रमाणे समाजही हेमाकडे वेगळया नजरेने पाहतो. ''बाबासाहेबांबरुबर काम क्येलय! हेच काम क्येलंय. तीस-चाळीस वरसं झटलो. पन ग्येली का, ग्येली जात? किती साल झाले तुमच्या लग्नाला? पाच! हया गावात -वज्रीला येवू-ाश्या-ा बी झालं की जनू तीन साडंतीन वरस! पन लोक काय म्हंतात अजून! काय म्हंतात? सतीश गोडघाटे, परध्यापज् बोधाचा आन् त्याची बायकू बामन, जाता येता पोरीसारी वाकूनवाकून वाकूनवाकून फातात. काय फातात?'' (पृ.३) असा परकीयांबरोबर स्वकीयांचाही त्याला विरोध असतो म्हणून काका दीड वर्ष त्यांच्या घरी आले नव्हते. (पृ.२)

जातीयता ही सवर्णाच्या रक्तातच भिनलेली आहे. याचाच अनुभव कॉलेजचे एन. एस.एस. च्या कॅम्पमध्ये येतो. संडासच्या सोप्या प्रोजेक्टचे प्रात्याक्षिक एका सावकाराच्या घरी केले जाते. तेथे सावकार चहा पाजतो. पण त्या एक दलितांसाठी असणारा ठेवणीतल्या कपात अरविंद देशमुख काळया, कुरुप विद्यार्थ्यांला दलित समजून तो कप दिला जातो. (पृ.१६) सो-ालला लग्नाविषयीची समजूत घालतानाही हेमा म्हणते, ''इथ्र जातीबाहेर जाण सहजासहजी आवडतं होय कुणाला'' (पृ.२९) त्याच प्रमाणे ''महार सगळे शिकले म्हणजे काय आंबेडकर होतात? तुम्ही कितीही शिकलात तरी तुमच्या सवयी जायच्या नाहीत. सभ्यता ज्शी ती कळणारच नाही तुम्हाला. '' ---त्या गोडघाटयाच्या आर्शीवादानं फार शेफारलास का? त्यानं कुठून बाई आणली कोणास ठाऊक आणि इथं येऊन मारे तोंड वर करुन म्हणतो, माझी बायको बामन! तो म्हणतो म्हणून आम्ही काय विश्वास ठेवणार थोडाच. मोठ्ठा होऊन मिरविण्यासाठी युक्ती केली असेल त्या महारानं. '' (पृ.३४), सवर्ण पूरग्रस्तांना पाठिंबा देण्यासाठी कॉलेज बंद ठेवणे (पृ.३६) व ''आइन टायमाला सगळे सवर्ण एकच असतात'' (पृ.३६) ''परजातीकडे जात वळते हेच खरं.'' (पृ.६०) ही काकांची प्रतिक्रिया, तसेच पृ.९ वर झालेले दासराव जोशींशी जातीवरुन झालेली खडाजंगी इत्यादी. या सर्वांतून जातीयतेचे दर्शन घडते.

समाजव्यवस्था ही समान संधी नाकारते. उदा. दासरावांचा दलितांच्या राखीव जागांवर डोळा असणे (पृ.१०) व पूरग्रस्त दलितांसाठी असणारी घरे दलितांना न मिळू देणे, उलट त्यांच्या यादीत दासराव जोशांसारख्यांचे नाव असणे, पवार कॉन्ट्रॅक्टरने आपल्या नातलगांची यादी पूर्ण होत नाही म्हणून कंप्लिशनचा रिपोर्ट देण्यास विलंब करणे इत्यादी.

सामाजिक श्रेष्ठ-कनिष्ठता व सामाजिक प्रतिष्ठा जपण्याच्या या समाजव्यवस्थेत कटाक्षाने पाळले जाते. काकांनी 'जयभीम' घातला तरी दासराव जोशी 'नमस्कार' घालतात. दासराव जोशी स्वतःला सामाजिकदृष्या श्रेष्ठ समजतात. विचार करण्याची पात्रता फक्त ब्राम्हणातच असते असे त्यांना वाटते म्हणूनच ते सतीशला म्हणतात, ''---तुमची इमेज जरा वेगळी आहे सर. आम्ही तुम्हाला अर्धे ब्राम्हणच समजतो सर, म्हणजे विचार या अर्थाने! ''(पृ.४४) दलित म्हणून हिणवला गेलेला अरविंद देशमुख आपले जातीश्रेष्ठत्व सिध्द करण्याची संधी मिळताच सवर्णाच्या मोर्चाला पाठिंबा दर्शविण्यासाठी कॉलेज बंद करण्यामध्ये पुढारीपण घेतो.(पृ.४१) दलित साहित्याच्या प्रत्येक साहित्य मेळाव्यात उपस्थित राहणारा, सामाजिक बांधिलकी मानणारा कवी विजय कुंडकर याला केवळ कवी म्हणून मिळणारी प्रतिष्ठा कमी वाटते. तो मराठा आहे म्हणून जन्माने मिळणारी प्रतिष्ठा मिळविण्यासाठी तो आपल्या नावासमोर 'पाटील' असे लिहतो (पृ.४२)

प्रस्तुत नाटकातील ज्या वेगवेगळया प्रवृत्ती व दृष्टिकोन लेखकांनी चित्रित केलेले आहेत त्याचप्रमाणे त्या त्या पात्रांची एक विशिष्ट वेदनाही आपोआप अभिव्यक्त झाली आहे. म्हणून जन्माने दलित नसणारी पण दलिताशी विवाह करुन स्व आणि स्वेतराचा दलितांपेक्षाही अधिक भावनांचा कोंडमारा सहन करणारी हेमा म्हणते, ''जात मोडून लग्न केलं आम्ही. ज्जा-कुणाचा विरोध पत्करला? आईवडिलांचा, नातलगांचा, सगळया सगळया. अगदी तुमचादेखील. '' (पृ.२) कोणीच तिला ढुंकून पाहत नाही. त्याचप्रमाणे ''सोनलला वाटतं मी आधार द्यावा तिला. कारा मी आंतरजातीय विवाह केलाय ना. आणि अर्जुन! एवढा घरादारात वावरजारा पोरगा; पण संतापाच्या भरात फाडफाड बोलला. महार म्हटलं तर शिवी ठरते आणि बामण म्हटलं तर? तर काय तो माझा गौरव होतो? जात मोडून विवाह केलाय मी समजून उमजून. ती शिवीच आहे माझ्यासाठी माझी विटंबना करणारी. जो तो आपआपल्या जातीच्या क्रूर नख्यांनी ओरबाडतो मला. कधी सावधपणे तर कधी बेसावधपणे. हेतू कोणताही असेल; पण प्रत्येक घाव एकेक जखम करतो मला. आहे कोणाला याची पर्वा? वाटतंय कुणाला आपली चूक झाली असं? (स्तब्ध होते) जे वास्तव मी उघडया डोळयानं स्वीकारलंय ते सहन करण्याचं आत्मबळ माझं मलाच मिळवावं लागेल. सतीश, माझ्या दुबळया क्षणी तू फक्त सावरुन घे मला.'' (पृ.४८) हेमाची होणारी घुमसट, तिची ही वेदना खूपच बोलकी आहे. जेव्हा जेव्हा वारंवार दलित म्हणून उपेक्षा होते. आपले ते आपले राहत नाही तेव्हा अर्जुन कमालीचा भावानात्मक होतो. 'तुझा ज्ोणी अपमान केला का? या सतीशच्या प्रश्नाला उत्तर देत तो म्हणतो, माझ्या जातीनं. ज्या जातीत मी माझ्ये इच्छेनं जन्म घेतला त्या जातीनं. शिकायचंही नाही मला. बेकारांचची संख्या काय कमी आहे या देशात? शिज्ून तरी काय मिळणार आहे? कोण पुसणार आहे माझ्या नावावरचा जातीचा शिक्का? शिकलात की तुम्ही--- आंतरजातीय लग्न केलंत. दिलं का घर तुम्हाला दासराव गुरुजीनं? आणि आव आणतो सुधारकांचा! ''(पृ.२३) दंगल होऊन दलितांवर पुन्हा अत्याचार केले जातात, तेव्हा तो सतीशला म्हणतो, ''---चार भिंतीच्या सुरक्षित घरात राहून बोलणं सोपं असते सर. वर्षानुवर्ष गळक्य झोपडीत रहावं लागतं तेव्हा विवेक आणि विचार डोक्यावर छप्पर धरत नाहीत. आमच्याकरिता म्हणून बांधलेल्या घरात आमच्यादेखत जर दासराव जोशांसारखे लोक राजरोजपणे राहणार असतील तर ते कसं चालेल आम्हाला? तुम्हाला चालेल? भाडयाचंसुध्दा घर द्याचं नाकारलं या गृहस्थानं तुम्हाला. हरामखोर साला. हे म्हणजे त्यांच ते त्याचं आणि आमचं तेही त्यांचंच? मग आमचं काय आहे सर इथं? काय आहे? आमची स्वतःची एकच गोष्ट आहे सर! वेद-ा!(पृ.४९) डॉ. आंबेडकरांची 'I have no mother land' असे म्हणण्यात जी वेदना होती, तीच वेदना इथे अर्जुनची आहे. त्याला निराधारपणाची वेदना असहय झाली आहे.

ज्ाका हे बाबासाहेबांच्या खांद्याला खांदा लावून काम करणारे होते. जातीच्या संदर्भात त्यांची वेदनाही विचाराला प्रवृत्त करणारी आहे. ''---म्या तर हाय आडानी मानूस. मला हयातलं काय कळत नाय. पर जातीकडे जात वळते हेच खरं.'' (पृ.६०) 'काळीज सुपाएवढं झाल्तं हया अर्जुनाचं धाडस पाहून'. हत्तीच बळ संचारल व्हतं माझ्या अंगात. म्हलं निघाला एक मर्द गडी. तुहयासारखे वाया गेले. सिकूनसवरुन वाया गेले पर हयांन दावल्ती आशा. पर हॅट! सतीशा, आरं दादासायब सत्तेमागं धावले तवा येडा बावरा झाल्ता जीव. मंग भंडारे बी गेला रुपवत्यांन बी तीच वाट धरली. गवई, खोब्रागडे न्हाई गेले पन निवडणुकीची घाई इ ाली ज्ी पु-हा सम्दे तिथंच. मुसळधार पावसानं गढी जागच्या जागी इरघळावं तसं झालं सम्दं. सगळा चिखोल. सम्दी उमीदच

जचली व्हती, पर हया पोरायचं करतुक पाहयलं आन जीवाला उभारी आली. पण हे बी त्याच वाटंने निघायलेत. आरे, जा सम्दे जा! हा काका बाबासाहेबाची आसली आवलाद हाय. घ्या तुमीच हारतुरे. पडा पाया कोनाच्या पडायच्या. म्या न्हाई झुज-ार! ज-ा हाय रं तो मला पाचशे रुपये देनार? मंत्री? पालकमंत्री? कोन्हाचा, कोन्हाचा पालक? मिळव तूच सरदारकी. हा पड्या मोडल, पण वाकनार न्हाई. खबरदार कोनी हात लावंल त हया मूर्तीला! तुह्यासारख्या खुनी मानसाची त सावली बी पडू नव्हो. शेवतंताला मारलीस तू. एक रांडव पोरीचा जीव घेतलास तू. निघ ----''(पृ.६३-६४) कोणतीही गोष्ट करायची असेल तर त्यासाठी सर्वस्व अर्पण करावे लागते. झोकून द्यावे लागते. त्यासाठी किंमत मोजावी लागते. म्हणूनच चळवळीचा उद्रेक म्हणणाऱ्या सतीशला अर्जुन म्हणतो, ''उद्रेक? सर्वनाश करणार? आणि आता होतोय त्याला काय म्हणायचं? जाळपोळ करणारे सहीसलामत सुटताहेत हा सर्वनाश नाही? सर येतो मी. वेळ मिळाली म्हणजे चर्चा करण्यासाठी येईल. म्हणजे माझी करमणूक होईल आणि तुम्हालाही खूप काही केल्याचं समाधान मिळेल. किंमत मोजावी लागते, चळवळीत उतरायचं तर किंमत मोजावी लागते असं तुम्हीच वारंवार सांगितलंत ना? किंमत मोजणं म्हणजे कय? नोकरी आणि प्रतिष्ठा सांभाळत बदनामीला तोंड देणं? तेही फक्त चर्चा करुन! एवढाच सोयीचा अर्थ लावत आलात तुम्ही! तुमच्या आवडत्या तत्त्वांचा! '' (पृ.७५-७६) ही त्याची चीरवेदना कातडीबचाव धोरण स्वीकारणाऱ्यांचा पर्दाफाश करणारी आहे.

'वाटा-पळवाटा' हे नाटक दलित नाटय चळवळ आणि समाजजीवनावरची एक जबरदस्त सामर्थ्यशाली व दलित चळवळी आणि समजजीवनावरची एक संसृतीटीका आहे. अर्जुन आक्रमक, विद्रोही, बंडखोर व दलितांचा सच्चा कार्यकर्ता आहे. या अर्जुनला कोणत्याही मार्गाने हाती घेतलेल्या कामात यश हवे असते. पूरग्रस्तांसाठी सरकारने बांधलेल्या घरांचा जबरदस्तीने ताबा घेण्याची त्याची मानसिकता ही त्याच्या बंडखोर, आक्रमक व विद्रोही स्वभावाचे द्योतक आहे. या ढोंगी समाजव्यवस्थेचा त्याला जूप राग आहे. त्याचे प्रमेय व सिध्दांतांना बाबासाहेबांच्या विचारांचे वैचारिक अधिष्ठान आहे. उच्चवर्णीयांबद्दलचा कमालीचा राग त्याला आहे. ''हजारो वर्षांची साचलेली समाजातील घाण धुऊन काढायची तर शंभर वर्षांचे आयुष्यदेखील अपुरं पडेल. '' (पृ.२०) ही त्याची मानसिकता आहे. म्हणून ज्यांच्यासाठी घरे बांधलेली आहेत त्यांनाच जर घरे मिळणार नसतील तर त्यासाठी तो कोणतीही गोष्ट करायला तयार असतो.

अर्जुनाला वडील नाहीत. फक्त आई आहे आणि तही मोलमजुरी करते. नाटकाच्या पहिल्या अंकात प्रवेश करतानाच 'जय भीम सर' या त्याच्या बोलण्यावरुन तो धाडसी, करारी कार्यकर्ता वा पुढारी आहे हे आपोआपच कळते. पूरगस्तांसाठी बांधलेल्या नावाखाली त्याच्या नातलगांची नावे यादीत समाविष्ट करतो. दासराव जोशासारख्यांचे नावही या यादीत असते. हे सर्व पाहून अर्जुनचा संताप अनावर होतो. त्यामुळे तो घरांची कुलपे तोडून दलितांना त्या घराचा ताबा देतो. यामुळे त्याला अटकही होते.

त्याच्या चळवळया स्वभावाचे काकांना मात्र कौतुक वाटते तर प्रा. सतीश गोडघाटे यांना ती बेफिकीर वृत्ती वाटते. शेवंता ही दलित विधवा स्त्री त्याच्याजवळ जमा होणाऱ्या वर्गणीच्या पैशांचा हिशेब मागते. मोर्चाच्या दिवशी तिचे सामान घराबाहेर असते. दंगलीत सवर्ण तिला मारुन टाकतात. तिच्या खुनाचे खापरही अर्जुनाच्या डोक्यावर फोडले जाते. त्यामुळे तो खुनी आहे असे समजून त्याला कॉलेजमधून काढून टाकण्याचा विचार होतो; पण प्रा. सतीश त्याला विरोध करतात. विद्यार्थी त्याला कॉलेजमधून काढून टाकण्यासाठी मोर्चाही काढतात.

सोनल ही दासराव जोशींची मुलगी त्याच्या प्रेमात पडते. आपल्या प्रेमाची जाणीव वडिलांना व्हावी म्हजून खोटेच लिहिलेले प्रेमपत्र ती दासरावांच्या निदर्शनास आणून देते. पण त्याचा उलटा परिणाम होतो. दासराव जोशी अर्जुनची दलित म्हणून हेटाळणी करतो; मात्र प्रसंगापासून तो कमालीचा जागृत होतो. म्हणूनच हेमाकडे आलेल्या सोनलचा तो पाणउतारा करतो. पण असे असूनही दंज्ल चालू असतानाच्या वेळेस जेव्हा तो वेळ निभावण्यासाठी सतीशकडे येतो तेव्हा त्याला काकाचे नाव घ्यावे लागते. त्यामुळे आश्रय मिळाला, असे त्याला वाटते. हेमा जेव्हा सोनलच्या प्रेमाविषयी त्याला विचारते तेव्हा तो म्हणतो, ---''बरं झालं, तिचं लग्न ठरलं. तिनं इच्छा व्यक्तं केली असती तरी मी लग्नाला तयार झालो नसतो. सोनल म्हणजे फुलपंखी वादळ होतं. तिनं मला माझ्या चळवळीपासून दूर नेल असतं. मला चळवळ सोडायची नाही. '' (पृ. ७५) त्याच्या या निर्धाराकडे पाहिले म्हणजे कुसुमाग्रजांच्या ओळी आठवतात.

'कधी न थांबलो विश्रांतीस्तव, पाहिले न मागे

बांधू न शकले प्रीतीचे वा कीर्तीचे धागे,
एक तारा समोर आणिक, पायतळी अंगार---''

या कवितेतल्या ध्येवेडयाची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. दलित समाजाच्या परिवर्तनासाठी व दलित चळवळीबद्दलची अर्जुनाची आत्मीयता यातून स्पष्ट होते.

त्याच्या बोलण्यातून परखडता जाणवते. प्रसंगी तो सतीशलाही आक्रमक पध्दतीने सांगायला कमी करत नाही. म्हणून शेवटी सतीश आपल्या जीवनशैलीतून बाहेर पडतो व अर्जुनचा जामीन घेण्यास सिध्द होतो.

थोडक्यात, संघर्षशील, ध्येयवेडा, कृतिशील, धडाडीचा दलित कार्यकर्ता, आक्रमक प्रसंगी कायदा हातात घेणारा , चळवळीसाठी आपले जीवन वाहून देणारा 'वाटा-पळवाटा' चा नायक दलित कार्यकर्त्यांना एक वेगळी दिशा दाखविजारा पथदर्शज ठरेल, असे म्हटले तर वागगे ठरु नये.

'वाटा-पळवाटा' नाटकातही इतर अनेक व्यक्तिरेखा महत्त्वपूर्ण आहेत. काका ही नाटकातील अत्यंत महत्त्वाची व्यक्तिरेखा आहे. आंबेडकरी विचाराने ती व्यक्तिरेखा भारावलेली असून कृती आणि विचाराने आंबेडकरवादी आहेत. आंबेडकरांबरोबर त्यांच्यानंतर ही दलित चळवळीत कृतियुक्त सहभाग आहे. या व्यक्तिरेखेच्या संदर्भात दत्ता भगत लिहितात, ''----पहिली पिढी ब्रिटिश राजवटीतील अशिक्षित, एखादया प्रश्नांची सखोल चर्चा करावी एवढी उसंत नसणारी, एवढा बौध्दिक आवाकाही नसणारी, पण प्रामाणिक आणि निष्ठावान कार्यकर्त्यांची, '' याचे प्रतिनिधित्त्व करणारी काकांची व्यक्तिरेखा होय. लहानपणी सतीशचे आई-वडील वारले तेव्हापासून त्याचा सांभाळ काकांनीच केलेला असतो. काका आंबेडकरी विचाराने झपाटलेले असले तरी सतीशने ब्राम्हण मुलीशी केलेला आंतरजातीय विवाह त्यांना मान्य नसतो. सहा महिने त्यांच्या घरी येत नाहीत त्यात त्यांचा व्यवहारी दृष्टीकोन असतो आपल्याच जातीची एक मुलगी सुखात राहिली असती ही त्यांची भूमिका असते. यातून आपल्या समाजाचा विज्ास व्हावा असे त्यांना मनोमन वाटत असते. एवढेच नव्हे तर शेवंता सारख्या विधवेला डी. एड्. करुन, तिला स्वतःच्या पायावर उभा राहता यावे यासाठी दासराव गुरुजीकडे खोटे अनुभवाचे प्रमाणपत्र मागतात यावरुन त्यांचा समाजाकडे आणि एकूणच दलित जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन दिसून येतो.

नाटकांच्या प्रारंभीच काका आणि हेमा यांच्यात संघर्ष होताना दिसतो. काका तिचा नेहमी 'बामण' म्हजून उल्लेख करतात त्यामुळे ती अतिशय व्यथित होते 'काका, एकटी असताना बोललात ते ठीकंय; पण निदान चारचौघात तरी असा पाणउतारा केल्यासारखं बोलत जाऊ नका.'' दासराव हा ब्राह्मण्य प्रवृत्तीचा प्रतिनिधी आहे. त्याचाही हेमा, काका सतीश आणि अर्जुन यांच्याशी या ना त्या प्रकारे संघर्ष होतच असतो. प्रथमतःच काकांना भेटल्यावर काका त्यांना 'जयभीम' करतात तर ते 'नमस्कार' घालतात. दलितांना दिल्या जाणाऱ्या राखीव जागांवर दासरावांची बारीक नजर असल्याचे काकांच्या लक्षात येते तेव्हा काकाही त्यांना स्वातंत्र्यसैनिकांच्या सर्व सवलती घेतात त्याचं काय? असा प्रश्न करतात. ''आता सिकायलेत पोरं आमचे. जरा सिकू द्या, मोठं व्हवू द्या. मंग घ्या की तुमचं तुमची. '' (पृ.१०) आपल्याला बुकं वाचून आंबेडकर कळत नाही, असे म्हणत आपल्यातले कर्तेपण ते दासरावांना सांगतात; मात्र काकांचं मनावर घेऊ नये, ''ते फक्त खोचक बोलतात. खोचक वागत नाहीत तुमच्यासारखं. ''(पृ.१४) असे हेमा दासरावांना सांगते आणि सतीश दलित म्हणून दासरावाने घर भाडयाने दिले नसल्याचा वचपा काढतो.

सोनलला एन. एस. एस. च्या शिबिराला न पाठविण्याचा दृष्ट हेतू सतीश त्याच्या नजरेश आणून देतो. यानिमित्ताने सतीश अरविंद देशमुखला दलित समजून सावकाराने दिलेल्या वागणुकीतून सवर्ण मानसिकतेला विरोध दर्शवितो. दासरावाकडून पूरगस्तांसाठी असलेल्या घरांचा अर्जुन जबरदस्तीने ताबा घेत असल्याचे कळते. बांधकामाचे कॉन्ट्रॅक्टर पवार हे प्रा. सतीशच्या संस्थेचे अध्यक्ष असल्याचेही तो संसूचन करतो. यासंदर्भात अर्जुनला सतीशने समज द्यावी असे दासराव सांगतो.

पूरग्रस्तांसाठी बांधलेल्या घरांचा ताबा द्यायला पवार तयार नसतात कारण त्यात त्याच्या नातलगांची यादी पूर्ण होत नव्हती. पावसाळा जवळ येतो म्हणून घराची कुलपे तोडून अर्जुनने दलित पूरग्रस्तांना घरे दिली. अशी ''हजारो वर्षांची साचलेली घाण धुऊन काढायची तर शंभर वर्षांच आयुष्यदेखील अपुरंच पडेल. ''(पृ.२०) असे अर्जुन सतीशला सांगतो. पण घरांची कुलपे तोडणे हे कृत्य बेकायदेशीर आहे, ती गुंडगिरी आहे, तुझ्यासकट सर्व समाजाला खाईत लोटतो आहे या सतीशच्या विरोधला पावसाळा आणि आपण आपल्या जातीचा विचार करायला हवा असे तो उत्तर देतो. दासराव जोशांसारख्यांचे नाव यादीत

असल्यामुळे अर्जुन संतापतो. आपला अपमान ''माझ्या जातीनं''(पृ.२३) केला. ही अर्जुनची वेदना बाबुराव बागुलांच्या 'जेव्हा मी जात चोरली' या कथेतील 'मला मनूने मारले' असे म्हणणाऱ्या नायकाची आठवण करुन देते.

समारोप

ज मी पण प्रभावी व्यक्तिरेखा, समर्पक शीर्षक, तीन पिढयांचा संघर्ष आणि त्या संघर्षाला मिळाले व्यापक स्वरुप, संघर्षाची चढती कमान आणि या संघर्षाला मिळालेले मानवतावादी वैचारिक अधिष्ठान नाटकाची उंची वाढवून जाते. यशस्वी आंतरजातीय विवाह (हेम-सतीश) आणि सोनल-अर्जुनचे अपयशी आंतरजातीय विवाह या विरोध लयीतून नाटकाला एक कलात्मक परिमाण लाभले आहे.

नाटककारास असलेले सामाजिक व ऐतिहासिक भान, कलात्मक तटस्थता यामुळे नाटकाला वाङमयीन उंची प्राप्त झाली आहे. दलित चळवळीचे, दलितांच्या समस्या, सामाजिक स्तरभेदांचे वास्तव चित्रण नाटकात केले आहे. नाटकाला मिळालेले व्यापक मानवतावादी-आंबेडकरवादी वैचारिक अधिष्ठान लाभलेले आहे.

एका विशिष्ट कालखंडातील सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक आणि जीवनपट दत्ता भगत यांनी आपल्यासमोर उभा केला आहे. ''स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातील आपल्या समाजाचे आतले स्वरुप, त्यातला भलेबुरेपणा त्यातील अंधार-उजेड सादर करण्यात नाटककाराला यश आले आहे.

तत्कालीन समाज जीवनातील वास्तवपट मांडण्याचा प्रयत्न दत्ता भगत 'वाटा-पळवाटा' या नाटकात समर्थपणे करतात. यावरुन त्यांचा समाजाकडे पाहण्याचा विशाल दृष्टीकोन दिसून येतो.

संदर्भ ग्रंथ

१. ज ऱ्हाडे सदाः दलित साहित्याच्या निमित्ताने, अभिनव प्रकाशन, मुंबई, प्र. आ. १९८२.
२. ज ंबळे ज मलाज र : स्वातंत्र्य मिळालंय म्हणं, निर्मल प्रकाशन, नांदेड प्र. आ. १९९०.
३. ज ुलकर्णी गो. म. : रंगयात्रा, संपा. वि. भा. देशपांडे, नाटयसंपदा प्रकाशन, मुंबई,१९८८
४. चव्हाण रामनाथ : बामणवाडा, श्री विदया प्रकाशन, पुणे, १९९१
५. जाधव रा. ग. : नव समीक्षा : काही प्रवाह, संपा. गो. म. कुलकर्णी, मेहता प्रकाशन, १९८२
६. पानतावणे गंगाधर : वादळाचे वंशज, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर,
७. शिरसाट शिवदास : दलित नाटक आणि दत्ता भगत यांचे नाटयविश्व.
८. शिंदे भि. शि : काळोखाच्या गर्भात, नीलकंठ प्रकाशन, पुणे, १९८१

पारसे बिरा दशरथ
सहयोगी प्राध्यापक मराठी विभाग, श्री. शिवाजी महाविद्यालय, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर